# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग दोन

## सोमवार, दिनांक १० एप्रिल, २०२३ / चैत्र २०, १९४५ (शके)

## लक्षवेधी सूचनांवरील प्रलंबित निवेदनांच्या प्रतींचे वितरण

**५७.** सर्व सन्माननीय विधानसभा सदस्यांना कळविण्यात येते की, विधानसभेचे सन २०२२ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन बुधवार, दिनांक १७ ऑगस्ट, २०२२ रोजी विधान भवन, मुंबई येथे सुरु होऊन गुरुवार, दिनांक २५ ऑगस्ट, २०२२ रोजी संस्थगित झाले.

संस्थगित झालेल्या प्रथम सत्रातील एकूण ५७ स्वीकृत लक्षवेधी सूचनांचे जोडपत्र दिनांक २५ ऑगस्ट, २०२२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले. त्यापैकी ६ निवेदने मा.सदस्यांना टपालखणाव्दारे त्याचदिवशी वितरीत करण्यात आली होती व एकूण ५१ लक्षवेधी सूचनांची निवेदने प्रलंबित होती. त्यापैकी १५ लक्षवेधी सूचनांची निवेदने सोमवार, दिनांक १२ सप्टेंबर, २०२२ रोजी पत्रक भाग-२ व्दारे वितरीत करण्यात आलेली आहेत. प्रलंबित ३६ निवेदनांपैकी १३ निवेदने गुरुवार, दिनांक २७ ऑक्टोबर, २०२२ रोजी पत्रक भाग-२ व्दारे वितरीत करण्यात आलेली आहेत. त्यानंतर प्रलंबित २३ निवेदनांपैकी ९ निवेदने गुरुवार, दिनांक १ डिसेंबर, २०२२ रोजी पत्रक भाग-२ व्दारे वितरीत करण्यात आलेली आहेत. प्रलंबित १४ निवेदनांपैकी ८ निवेदने गुरुवार, दिनांक १९ जानेवारी, २०२३ रोजी पत्रक भाग-२ व्दारे वितरीत करण्यात आलेली आहेत. आता एकूण ६ निवेदनांपैकी ३ निवेदने शाखेत प्राप्त झाली असून ती यासोबत वितरीत करण्यात येत आहेत.

**विधान भवन,**
**मुंबई,**
**दिनांक : १० एप्रिल, २०२३**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

**याची प्रत :**

१. महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य.

२. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.

३. संगणक कक्ष (website.)

पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग. लक्षवेधी सूचना.

महाराष्ट्र विधानसभा

सन-२०२२ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

नियम १०५ अन्वये श्री. रत्नाकर गुट्टे, वि.स.स. यांनी उपस्थित केलेली लक्षवेधी सुचना.

"औष्णिक विद्युत केंद्र, परळी (जि. बिड) येथून बाहेर पडणाऱ्या राखेची व्यवस्थीत विल्हेवाट लागत नसल्याने या परिसरात राखेचे कण दिवस-रात्र हवेत राहत असल्याने धुक्याप्रमाणे राखेची चादर हवेत पसरलेली असणे व त्यामुळे नागरिकांच्या आरोग्य धोक्यात आलेले असणे, त्यामुळे विविध प्रकारचे फुफुसाचे आजार त्यांना जडले असणे, राखेमुळे त्यांच्या जीवनमानावर विपरित परिणाम झालेला असणे, नागरिकांना अनेक प्रकारचे त्रास होत असणे, दुचाकी-वाहनचालक यांना परळी-गंगाखेड रस्त्यावर प्रवास करीत असताना राखेच्या परसलेल्या चादरमुळे प्रवास करताना जिकरीचे होणे, त्यातच वारंवार अपघाताचे प्रमाण वाढले असल्याचे निदर्शनास येणे, मोठया प्रमाणावर नागरिकांमध्ये या राखेमुळे प्रचंड असंतोष व नाराजी पसरलेली असणे, या राखेच्या विरोधात महिला व नागरिकांनी अनेकदा राखेची वाहतूक करणारे कंटेनर अडवून आंदोलने केलेली असणे, परंतु अद्यापही ही वाहतूक बंद झालेली नसणे, शेतांमध्ये राख टाकली जात असल्याने जमिनीचा कस नाहीसा होऊन जमिनी नापिक होत असल्याचेही निदर्शनास येणे, संपूर्ण परळी शहरासह थर्मल पॉवर परिसरातील अनेक गावांवर याचा विपरित परिणाम झाला असून जनजीवन विस्कळीत झालेले असणे, अधिकाऱ्यांना सूचना देऊनही राखेबाबत कोणतीही योग्य प्रकारे विल्हेवाट लावली जात नसणे, औष्णिक विद्युत केंद्र, परळी येथून बाहेर पडणाऱ्या राखेची व्यवस्थीत विल्हेवाट लावण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (गंगाखेड) यांनी मा. पर्यावरण मंत्री, यांना दि. १४ फेब्रुवारी, २०२२ रोजी निवेदन देऊन मागणी केली असणे, परंतु याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने चौकशी करुन सदरहू राखेची योग्य प्रकारे विल्हेवाट लावून परळी शहर व थर्मल पॉवर परिसरातील नागरिकांना दिलासा देण्याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना, यावर शासनाची प्रतिक्रिया"

---

मा. मंत्री (पर्यावरण व वातावरणीय बदल) यांचे निवेदन

परळी वैजनाथ या तालुक्यात असणाऱ्या महाजेनकोच्या औष्णीक विद्युत केंद्रांची स्थापना १९७१ साली झालेली असून सध्यस्थितीत एकूण ७५० मेगावॅट इतकी वीजनिर्मिती संच क्रमांक ६,७ व ८ (२५० मेगावॅट प्रति संच) अशा तीन संचाद्वारे करण्यात येते. यासाठी इंधन म्हणून दगडी कोळसा १२९६० मे.टन प्रतिदीन व फरनेस ऑईल २५ के.एल प्रतिदीन वापरले जाते. सदरील दगडी कोळसा हा एससीसीएलच्या कोळसा खाणीतून पुरविला जातो.

औष्णिक विद्युत केंद्राने धुरांडयातून हवेमध्ये सोडण्यात येणाऱ्या प्रदूषण नियंत्रण करण्याकरीता संच क्र.६,७ व ८ करिता ESP (Electro Static Preceptor) या स्वरूपाची हवा प्रदूषण सनियंत्रण यंत्रणा बसविलेली असुन, ती कार्यान्वित आहे. कोळसा हाताळणी (Unloading & Crushing) विभागामध्ये प्रदूषण नियंत्रणाकरीता डस्ट कलेक्टर या स्वरुपाची हवा प्रदूषण सनियंत्रण

सल्फरडॉय ऑक्साईड या प्रदूषकाच्या नियंत्रणाकरिता केंद्रीय वने,पर्यावरण व वातावरणीय बदल, भारत सरकार यांच्या दि.३१/०३/२०२१ रोजीच्या अधिसूचनेनुसार सदर औष्णीक विद्युत केंद्रास दिनांक ३१/१२/२०२४ पर्यंत फ्ल्यु गॅस डीसल्फरलायझेशन (एफजीडी) ही संयंत्रणा बसविणे बंधनकारक केली असुन, संच क्रमांक ६,७ व ८ (२५० मेगावॅट प्रति संच) करिता एफजीडी बसविण्याबाबतची प्रक्रिया महाजनकोतर्फे सुरु आहे.

औष्णीक विद्युत केंद्रांमध्ये औद्योगिक वापराकरीता लागणा-या पाण्याचे प्रमाण ६३५७० घन मीटर प्रतिदिन असुन, सदर पाणी पुरवठा माजलगाव धरणातून करण्यात येतो. यामधून निर्माण होणाऱ्या ५२४० घन मीटर प्रतिदीन सांडपाण्यावर प्राथमिक स्वरुपाची प्रक्रिया करुन सदरचे सांडपाणी राखेची हाताळणी करणे करीता वापरण्यात येत. तसेच घरगुती वापरासाठी ४०० घन मीटर पाणी लागत असून यामधून निर्माण होणाऱ्या १५० घन मीटर इतक्या सांडपाण्यावर प्राथमिक व द्वितीय स्वरुपाची प्रक्रिया करुन सदरचे प्रक्रियाकृत सांडपाणी रहिवाशी क्षेत्रातील हरीत पट्ट्यांकरीता पुर्नवापर करण्यात येते. तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे सदर औष्णीक विद्युत केंद्रांमध्ये बसविण्यात आलेल्या वातावरणीय हवा प्रदूषण यंत्रणेद्वारे वातावरणीय हवेचे नमूने घेवून हवेची गुणवत्ता तपासली जाते. तसेच औष्णिक विद्युत केंद्रामार्फत ४ ठिकाणी सतत हवा गुणवत्ता तपासणी केंद्र(Continuous Ambient Air Quality Monitoring station) उभारण्यात आलेली आहे.

औष्णीक विद्युत केंद्रामधुन ५२०० मे.टन प्रतिदिन इतकी राख निर्माण होते. केंद्रीय पर्यावरण व वने मंत्रालयाच्या अधिसूचनेनुसार सदर राखेची विल्हेवाट ही सद्य:स्थितीत वीट उत्पादनात, सिमेंट उत्पादन या उद्योग क्षेत्राद्वारे करण्यात येते. सदर औष्णीक विद्यूत केंद्रातून निघणारी राख बंदिस्त सिलोतून टँकरमध्ये (Bulker) भरुन वाहतूक केली जाते. या वाहतुकीसाठी औष्णीक केंद्रातर्फे कंत्राटदारांना परवानगी देण्यात आलेली आहे.

बॉटमअॅश ही पाण्यासोबत मिश्रीत करुन बंद पाईपद्वारे औष्णीक विद्यूत केंद्राजवळ (२०० मीटर) असलेल्या दावतपूर अॅशबंड नं. २, सदरचे क्षेत्रफळ १९८ हेक्टर असून, येथे सोडण्यात येते व अॅशबंड मधून राखेचा निचरा होवून निघणारे पाणी पुर्न:वापरासाठी घेण्यात येते. टोकवाडी अॅशबंड (९२ हेक्टर क्षेत्रफळ) हा मागील ३ वर्षापासुन पूर्णता: बंद करण्यात आलेले आहे. तसेच दावतपूर अॅशबंड नं.१ ( ११० हेक्टर क्षेत्रफळ) हा मागील ६ महिन्यांपासून बंद करण्यात आलेला आहे. या दोन्ही अॅशबंडमध्ये कुठलीही राख टाकण्यात येत नाही. तसेच सद्य:स्थितीत औष्णीक केंद्रातून निघणारी राख अंदाजे ९०० मेट्रीक टन/दिन दावतपूर अॅशबंड नं.२ मध्ये सोडण्यात येते.

परळी औष्णीक विद्युत (जि.बीड) केंद्रातून बाहेर पडणाऱ्या राखेमुळे नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत असल्याबाबतच्या अनुषंगाने कार्यकारी संचालक (पर्यावरण व सुरक्षा) महानिर्मिती यांचेनुसार अॅशबंडमधील राख ही स्थानिक विटभट्टी धारकांना देण्यात येते. सदरील राखेची वाहतुक करतेवेळी काही वाहतुकदार विना अच्छादन वाहतुक करत असल्याकारणाने जोराचा वारा सुटल्यानंतर राख काही प्रमाणात हवेत उडत असते. तसेच काही विटभट्टी धारकांनी राख त्यांच्या शेतात जमा करुन ठेवलेली असल्यामुळे ती देखील हवेत उडत असते. त्यासंबंधी वेळोवेळी अशा वाहतुक करणाऱ्या वाहनांविरुध्द पोलिसात तक्रार करण्यात आलेल्या आहेत. वैद्यकीय अधीक्षक, उप-जिल्हा रुग्णालय परळी यांच्या दिनांक १५/०३/२०२२ च्या अहवालानुसार परळी औष्णीक विद्युत केंद्रातून बाहेर पडणा-या राखेमुळे जनतेच्या आरोग्यावर परिणाम झाल्याचे

शेतकऱ्याच्या शेतात टाकली जात नाही. सदर राख ही दाउतपूर बंधाऱ्यात साठवणूक केली जाते. परंतु राखेच्या वाहतुकीमुळे किंवा वीट व्यवसाय यामुळे राख हवेच्या झोतामार्फत पिकांवर पसरली जाते, परंतु या प्रक्रियेमुळे पिकाच्या उत्पादानावर परिणाम झाल्याचे दिसून आले नाही किंवा तशी शेतकऱ्यांची तक्रार प्राप्त झाली नाही.

सहाय्यक पोलिस निरिक्षक परळी, ग्रामीण पोलिस स्थानक यांच्या दि.१५/०३/२०२२ रोजीच्या अहवालानुसार औष्णिक विद्युत केंद्र परळी येथील राख वाहतुकीमुळे परळी पोलिस स्थानक ग्रामीण हद्दीत नजिकच्या काळात अपघात झालेला नाही.

औष्णिक विद्युत केंद्राने बसविलेल्या हवा प्रदूषण सयंत्रणेमध्ये कालबध्द सुधारणा करण्याबाबत मंडळातर्फे दि. ०८/०१/२०२१ रोजी विद्युत केंद्रास प्रस्तावित निर्देश देण्यात आलेले आहेत, तसेच केंद्रीय वने,पर्यावरण व वातावरणीय बदल भारत सरकार यांच्या दि.३१/०३/२०२१ रोजीच्या अधिसूचनेनुसार सदर औष्णीक विद्युत केंद्रास दि. ०१/१०/२०२१ रोजी सदरील अधिसूचनेचे पालन करण्याबाबत निर्देश दिले आहेत. तद्नंतर केंद्रीय वने,पर्यावरण व वातावरणीय बदल भारत सरकार यांनी राख हातळणी व व्यवस्थापन करणेबाबत दि. ३१/१२/२०२१ रोजी जारी केलेल्या सुधारीत अद्यादेशाच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियत्रंण मंडळातर्फे दि. ०२/०३/२०२२ रोजी औष्णिक विद्युत केंद्रास राख हाताळणी व व्यवस्थापन योग्यरीत्या करण्याकरीता निर्देश बजावण्यात आलेले आहेत. तसेच दि. २२/१२/२०२१ रोजी करण्यात आलेल्या पाहणीदरम्यान आढळुन आलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने दि. ०८/०२/२०२२ रोजी औष्णीक केंद्रास कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली आहे.

मा. मंत्री (पर्यावरण व वातावरणीय बदल) यांचे कडून पाठविलेले पत्र दि. १४/०३/२०२२ रोजी प्राप्त झालेले असुन सदर प्रकरणी आवश्यक ती कार्यवाही करून त्याचा अहवाल शासनास सादर करणेबाबत शासनाने दिनांक-१४/०३/२०२२ रोजीच्या पत्रान्वये मंडळास कळविण्यात आले आहे. तथापि मंडळास स्थानिक प्रतिनिधीव्दारे डिसेंबर,२०२१ मध्ये भ्रमणध्वणीव्दारे तक्रार प्राप्त झालेली होती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक २२/१२/२०२१ रोजी करण्यात आलेल्या पाहणीदरम्यान आढळून आलेल्या त्रुटीच्या अनुषगाने महाराष्ट्र प्रदूषण नियत्रंण मंडळातर्फे दिनांक ०८/०२/२०२२ रोजी औष्णिक केंद्रास कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली आहे.

---

लक्षवेधी सूचना | गृह विभाग

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२२ चे (तिसरे) पावसाळी अधिवेशन

डॉ. भारती लव्हेकर, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:

दिनांक १४.०८.२०२२ रोजी पहाटे ५.०५ मी. मुंबई पुणे द्रुतगती मार्गावर रासायनी पोलीस ठाणे हद्दीत गाडी क्रं. एम.एच. - ०१ डि. पी. ६३६४ इंडीवरचा अपघात झाला हे खरे आहे असणे, सदर अपघाताची सुचना पोलीसांना पहाटे ५.५८ मी. मिळाल्याची शक्यता असणे, अपघाताबाबत डायल क्रं. १०० व ११२ या क्रमांकावर सुचना किती वाजता व कोणी दिली याची शहानिशा होणे गरजेचे असणे, रुग्णवाहिका घटनास्थळी कोणाच्या सुचनावरून पोहोचली व सूचना मिळाल्यानंतर पोलीसांनी त्यांच्या स्तरावरून कोणती कारवाई केली व सदर कारवाईचा तपशिल प्राप्त होणे गरजेचे असणे, सदर अपघाताचा तपशिल दयावा नसल्यास गुन्हा दाखल नसल्याची कारणे अद्यापही पोलिसांकडे नसणे, अपघातग्रस्तांना गोल्डन अवर मध्ये रुगणालयात नेण्यात आले का? अपघाताची सुचना रुग्णवाहिका व पोलीस प्रशासन घटनास्थळी दाखल होणे या दरम्यानचा कालावधी किती याची माहिती जनतेस कळणे अत्यंत महत्वाचे असणे, रुगणवाहिका व पोलीस प्रशासनाकडून घटनास्थळी पोहोचण्यास विलंब झाला आहे काय असल्यास जबाबदारी कोणाची आहे विलंबास कारणीभूत असलेल्या नवि मुंबई / रायगड पोलीस प्रशासन यांच्या अधिकार क्षेत्राचा मुद्दा उपस्थित झाला असणे, शासन या मुद्दयावर काय उपाययोजना करणार? जेणे करून मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर भविष्यात निष्पाप बळी जाणार नाहीत. सदर अपघात प्रकरणी गुन्हा दाखल आहे किंवा कसे पोलीस प्रशासनाने कर्तव्यात कसून अथवा चालढकल केली आहे काय, शासन स्तरावरून संबंधितावर जबाबदारी निश्चित करून कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व श।सनाची प्रतिक्रिया व भूमिका."

### मा.उपमुख्यमंत्री (गृह) यांचे निवेदन

फोर्ड इन्डेव्हर वाहन क्रमांक एमएच-०१-डीपी-६३६४ मधून माजी विधानपरिषद सदस्य श्री.विनायक मेटे हे चालक एकनाथ कदम व अंगरक्षक पोलीस हवालदार राम ढोबळे यांसह पुणे-

पहाटे ०५:०० च्या सुमारास रसायनी पोलीस स्टेशनच्या हद्दीत त्यांच्या वाहनाचा अपघात झाला आहे. सदर द्रुतगती मार्गावरील तिसऱ्या लेनवर कि.मी. १५.७०० ते कि.मी. १५.९०० चे दरम्यान वाहनचालकाचा वाहनावरील ताबा सुटून पुढे जाणाऱ्या आयशर ट्रक या वाहनाला पाठीमागून ठोकर लागुन हा अपघात झाला आहे.

सदर अपघाताचा कॉल डायल ११२ यांना ०५.०७ वा. प्राप्त झाल्यावर कॉल सिस्टीमद्वारे ०५.१३ वा. पोलीस नियंत्रण कक्ष, नवी मुंबई यांना ॲटो डिस्पॅच झाला. पोलीस नियंत्रण कक्ष, नवी मुंबई यांनी सदरचा कॉल पनवेल तालुका बिट मार्शल-२ यांना दिला. बिट मार्शल-२ यांनी कॉलर यांना कॉल करुन विचारले असता एक्सप्रेस हायवेवर श्री. विनायक मेटे साहेब व पोलीस बॉडीगार्ड यांचा अपघात झाला आहे, तुम्ही लवकर या अशी माहिती मिळाली.

सदर माहिती प्राप्त होताच बीट मार्शल व संबंधित अधिकारी यांनी तात्काळ अपघातस्थळाचा शोध घेण्याचा पुरेपूर प्रयत्न केला, परंतु अपघाताचे नेमके ठिकाण मिळून येत नसल्याने बीट मार्शल-२ चे पोलीस हवालदार श्री.तांडेल यांनी कॉलर यांना त्यांचे लोकेशन पाठविण्यास सांगितले. त्यादरम्यान रात्रपाळीचे पनवेल तालुका पोलीस ठाणे अंमलदार पोलीस उप निरीक्षक श्री.भरत पाटील यांनी भातण बोगदा पार करून रायगडच्या हद्दीतील पहिल्या यु-टर्न पर्यंत अपघाताचे ठिकाणची पाहणी केली परंतू त्यांना अपघाताचे ठिकाण आढळून आले नाही. ०५.३९ वा. कॉलरने अपघाताच्या ठिकाणचे लोकेशन बीट मार्शल-२ चे पोलीस हवालदार श्री.तांडेल यांना पाठविल्यावर ते रायगड जिल्ह्याच्या हद्दीतील असल्याचे समजले व तात्काळ सदर अपघाताची माहिती नियंत्रण कक्ष, रायगड यांना कळवली. या सर्व कार्यवाहीत ३० मिनिटांचा कालावधी गेला. नियंत्रण कक्ष, रायगड यांनी तात्काळ सदर अपघाताची माहिती रसायनी पोलीस ठाणे यांना दिली. माहिती प्राप्त होताच महामार्ग पोलीस विभागाकडून दखल घेऊन अपघातग्रस्तांना मदत मिळणेकरिता यंत्रणा तात्काळ राबविण्यात आलेली आहे.

यादरम्यान एका वाहनचालकाकडून सदर अपघाताची माहिती मिळताच आय.आर.बी. चे गस्त पथक अपघातस्थळी पोहचून त्यांनी ०५.५० वा. अपघातग्रस्त गाडीतील जखमी असलेले श्री. विनायक मेटे व चालक एकनाथ कदम यांना उपचारासाठी एम.जी.एम. हॉस्पिटल, कामोठे ला रवाना केले. त्यांनतर महामार्ग पोलीस केंद्र पळस्पे यांचे पथक अपघातस्थळी ०६.०५ वा. पोहचले. त्यांनी गॅसकटरच्या सहाय्याने अपघातग्रस्त गाडीचा पत्रा कापून आत अडकलेले अंगरक्षक पोलीस

सदर अपघातग्रस्त वाहनाने ज्या ट्रकला पाठीमागून ठोकर मारुन अपघात झाला, त्या संशयीत वाहनाचा शोध महामार्गावारील सी.सी.टी.व्ही फुटेजच्या आधारे घेण्यात आला असून सदर वाहन चालकास ताब्यात घेण्यात आले. याबाबत त्याच्याकडे केलेल्या चौकशीत त्याने त्याचे ताब्यातील आयशर ट्रक नं. डीएन-०९-पी-९४०४ व अपघातग्रस्त इंडेव्हर गाडी दरम्यान अपघात झाला असल्याची कबुली दिली आहे.

सदर प्रकरणी रसायनी पोलीस ठाणे (जि. रायगड ) येथे आकस्मात मृत्यू रजि.नं. २४/२०२२ सी.आर.पी.सी. १७४ अंतर्गत दाखल करण्यात आला असून सदर अपघाताची सखोल चौकशी होणे करीता या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या दिनांक १७.८.२०२२ रोजीच्या आदेशान्वये अपर पोलीस महासंचालक, राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे वर्ग करण्यात आला असून सदर प्रकरणाबाबत सखोल चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले होते. त्याअनुषंगाने सदर प्रकरणी राज्य गुन्हे अन्वेषण विभागाने अपघाती मृत्यूची चौकशी करून चौकशीअंती दि.१५.११.२०२२ रोजी वाहन चालकाविरुध्द रसायनी पोलीस ठाणे गु.र.नं.२१८/२०२२ भा.द.वि. कलम ३०४(II), २७९, ३३७, ३३८, ४२७ सह मोटार वाहन कायदा कलम १८४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास चालू आहे.

अपघात झाल्यानंतर गोल्डन अवरमध्ये उपचार मिळण्याकरिता उशीर झाला का याची चौकशी करण्याकरिता पोलीस महासंचालक यांच्या दि.२३.०८.२०२२ रोजीच्या पत्रान्वये अपर पोलीस महासंचालक (वाहतूक), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना अहवाल सादर करण्याबाबत तसेच महामार्गावरील गंभीर अपघातानंतर प्रतिसाद यंत्रणा (Response Mechanism) सुधारण्याकरिता, सध्याच्या यंत्रणेमध्ये आपत्कालिन परिस्थितीत त्वरीत मदत मिळण्याकरीता काही संस्थात्मक बदल करणे आवश्यक आहेत का याबाबत सूचना कळविण्याबाबतही आदेशित करण्यात आले आहे.

*****

लक्षवेधी सूचना क्र.३४

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२२ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

श्री.दौलत दरोडा, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.३४ पुढील प्रमाणे आहे :-

"ठाणे जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागातून नियम वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेल्या शिक्षकांना निवृत्तीनंतरच्या हक्काच्या आर्थिक सुविधा गेल्या दोन वर्षापासून मिळाल्या नसल्याची बाब माहे जुलै, २०२२ रोजीच्या सुमारास निदर्शनास येणे, या संदर्भात मा.मुख्यमंत्री श्री.एकनाथजी शिंदे यांच्याकडेही लेखी निवेदन देण्यात येणे, परंतु अद्यापही कोणतीच कार्यवाही न झाल्याने या सेवानिवृत्त शिक्षकांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याकरिता शासनाने तातडीने या शिक्षकांना निवृत्तीनंतरच्या हक्काच्या आर्थिक सुविधा पुरविण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

**श्री.दीपक केसरकर, मा. मंत्री (शालेय शिक्षण) यांचे निवेदन**

ठाणे जिल्हा परिषद अंतर्गत नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेल्या प्राथमिक शिक्षकांना निवृत्तीनंतरच्या हक्काच्या आर्थिक सुविधा सन २०२०-२१ या वित्तीय वर्षांत अंशराशिकरण व उपदान देयके अदा करणेसाठी अनुदान कोषागारातुन आहरीत करुन उपलब्धतेनुसार नियमित वेतन/कुटुंब निवृत्तीवेतन अदा करुन शिल्लक अनुदान तालुका स्तरावर वितरीत करुन प्रलंबित अंशराशीकरण व उपदान देयके संबंधित प्राथमिक शिक्षकांना अदा केले आहेत. सन २०२०-२१ पासून संपूर्ण देशभरात कोरोना विषाणूमुळे उद्भवलेल्या महामारीच्या परिस्थितीमुळे राज्यात आर्थिक टंचाई निर्माण झाल्यामुळे प्रत्येक महिन्यांकरिता वेतन व इतर बाबींसाठी आवश्यक असणारा निधी मर्यादित मासिक स्वरुपात तात्पुरती व्यवस्था म्हणून वित्त विभागाकडून खर्चासाठी उपलब्ध करुन देण्यात येत होता. तसेच प्राथमिक शिक्षकांना निवृत्तीनंतरचे लाभ सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात मंजूर तरतुदीच्या ७२.५ टक्के, सन २०२१-२२ या आर्थिक वर्षांत मंजूर तरतुदीच्या ७३.३ टक्के व सन २०२२-२३ या आर्थिक वर्षांत मंजुर तरतुदीच्या ७७.५ टक्के अनुदान वितरीत करण्यात आलेले आहे. प्राथमिक शिक्षकांचे नियमित निवृत्तीवेतन, कुटुंब निवृत्तीवेतन, प्रलंबित अंशराशीकरण व उपदान उपलब्ध तरतूदीमधून क्षेत्रिय कार्यालयामार्फत अदा करण्यात येत आहे. याकरिता पुरवणी मागणी प्रस्तावित असून निधीच्या उपलब्धतेनुसार संबंधित देयके अदा करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

****************

रोता/एब-७०८[७००-१२-२२]
पा.बी - २२५३(३)-७०० प्रती